# भारतातील लोकसंख्या वाढ : घातक की बादक !

**प्रा. मोठे भैरनाथ बब्रुवान**
**अर्थशास्त्र विभाग**
**शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय,**
**लोहारा ता. लोहारा जि. उस्मानाबाद**
**महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना:**

कोणताही देश विकसीत, विकसनशील अथवा अविकसित असो त्यामध्ये लोकसंख्येच्या प्रश्नाचे दुहेरी महत्व असल्याचे दिसून येते. लोकसंख्या ही आर्थिक विकासाचे एक महत्वाचे साधन आहे. पण कांही वेळेला हीच लोकसंख्या आर्थिक विकासाला घातक ठरते म्हणून देशाच्या विकासाच्या दृष्टीने लोकसंख्येत होणारे बदल हे त्या देशातील उपलब्ध असणा—या नैसर्गिक साधनसामग्रीचा अतिरिक्त लोकसंख्या ही त्या देशाला घातक ठरेल.भारतातील लोकसंख्या वाढही भविष्यात देशाचा आधार असली तरी आज लोकसंख्येच्या प्रश्नाने गंभीर स्वरुप धारण केले आहेत्र कारण भारताची लोकसंख्या ही आधीच न पेलणारी असून त्यात प्रतिवर्षी वाढ होत आहे. म्हणून आज भारत देशासमोर लोकसंख्या वाढ घातक की बादक हा मुलभूत प्रश्नच उद्‌भवतो.

**भारतातील लोकसंख्या बदलाचा परामर्श:**

आगामी काळात भारत हे एक आर्थिक महासत्ता म्हणून उदयास राष्ट्र असून म्हणून भारतास ओळखले जायचे आता तिस—या क्रमांकाचा जगातील एक सामर्थ्यशाली देश म्हणून भारताची गणना होऊ लागली आहे. अमेरिका देशाचे माजी राष्ट्र्ध्यक्ष ‘बराक ओबाम’ यांनी नोव्हेंबर २०१० भारत भेटीत असे म्हटले आहे की, भारत हा विकसनशील देश राहिला नसून तो यापुर्वीच विकसीत देश म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. तसेच भारताच्या आर्थिक प्रगतीवरुन पी.डब्ल्यू.सी. संस्थेने केलेल्या सर्वेक्षण अहवाल द वर्ड इन २०५० च्या निकर्षानुसार भारत आगामी ४० वर्षात अमेरिकेला मागे टाकू शकेल कारण आगामी

चार दशकात आपल्या वाढत्या लोकसंख्येचा फायदा या देशाला मिळेल. यावरुन भारतीय लोकसंख्येची अर्थव्यवस्थेतील गर्भित शक्ती दिसून येते. म्हणूनच कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यासस करण्यासाठी लोकसंख्येच्या अभ्यासास अन्य साधारण असे महत्व प्राप्त झाले आहे.

देशाच्या लोकसंख्येचा आर्थिक विकासावर प्रभाव पडत असतो.म्हणून लोकसंख्या मर्यादित असल्यास आर्थिक विकासाला चालना मिळते.लोकसंख्या जास्त असल्यास आर्थिक विकासाला चालना मिळत नाही. थोडक्यात लोकसंख्या व देशाचा आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध असल्याचे दिसून येते. त्यामुळे लोकसंख्या विषयक बदलाचा अभ्यास करण्यासाठी लोकसंख्येची माहिती गोळा करावी लागते. भारत देशात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९५१ पासून दर १० वर्षाला जनगणना होते. सन २०११ मधील १५ वी जनगणना आहे.

**जनगणनानुसार लोकसंख्या वाढीचा आकृतीबंध**

**(सन १९५१ ते २०११)**

| **वर्ष** | **लोकसंख्या(कोटी—लक्ष)** | **लोकसंख्येतील वाढ(+)घट** | **दशकातील शेकडा वाढ** |
|---|---|---|---|
| १९५१ | ३६ कोटी ११ लक्ष | — | — |
| १९६१ | ४४ कोटी २४ लक्ष | + ८ कोटी १३ लक्ष | + २१.१५ टक्के |
| १९७१ | ५५ कोटी १३ लक्ष | + १० कोटी ८९ लक्ष | + २४.४० टक्के |
| १९८१ | ६९ कोटी ०१ लक्ष | + १३ कोटी १८ लक्ष | + २४.६० टक्के |
| १९९१ | ८४ कोटी ६३ लक्ष | + १५ कोटी ६२ लक्ष | + २३.६० टक्के |
| २००१ | १०२ कोटी ८७ लक्ष | + १८ कोटी २७ लक्ष | + २१.३० टक्के |
| २०११ | १२१ कोटी ०२ लक्ष | + १८ कोटी १५ लक्ष | + १७.७० टक्के |

**स्त्रोत: २०११ च्या जनगणनेवर आधारित.**

आज देशाची एकुण लोकसंख्या १२१ कोटी ०२ लाख आहे. अशी स्थिती वास्तवात लोकसंख्यावाढीची असू लोकसंख्या वाढीचा दर सध्या स २०११ मध्ये सन २००१—२०११ या वर्षाच्या

तुलनेत लोकसंख्या दशत घट होऊन २१. १५ टक्के वरुन तो सन २०११ मध्ये १७.७० टक्के इतका घट झाल्याचे दिसून येते. म्हणजे तो सिमांत उत्पादनाच्या आलेखाप्रमाणे दिसून येतो.

सन २०११ मध्ये लोकसंख्या वाढीचा दर घटला असला तरी जगात लोकसंख्याच्या वाढीमध्ये भारताचा दुसरा क्रमांक लागतो. तर चीनचा प्रथम क्रमांक लागतो.जगाच्या एकुण लोकसंख्येपैकी भारताची १७.५ टक्के लोकसंख्या भारतात राहतात.

थोडक्यात भारताच्या लोकसंख्येत होणारी वाढ ही जास्त प्रमाण असून प्रत्येक वर्षी १ कोटी ९० लक्ष लोकांची भर पडत असते. २०२० पर्यंत भारताची लोकसंख्या १३३ कोटीच्या पुढे जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. लोकसंख्येत सतत पडणारी भर अर्थव्यवस्थेस तारक ठरत नाही. तर ती उलट मारक ठरते. लोकसंख्या वाढल्यामुळे काम करणा—यांची संख्या वाढेल पण त्याप्रमाणात सर्वांनाच रोजगार मिळणार नाही. एकीकडे देशाचा विकास दर दुसरीकडे अतिरिक्त लोकसंख्येच्या समस्थेमुळे विकास प्रक्रियेत अनेक अडथळे निर्माण होत आहेत.

**अतिरिक्त लोकसंख्येमुळे देशाच्या आर्थिक विकासात येणारे अडथळे**

लोकसंख्या हा आर्थिक विकासाचा प्रमुख असा सक्रिय घटक आहे. आर्थिक विकास आणि लोकसंख्या यांचा जवळचा संबंध असल्याचे दिसून येते.परंतु अतिरिक्त लोकसंख्यावाढीने अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. त्या पुढील प्रमाणे.

१. लोकसंख्या वाढीमुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात घट होते.
२. अन्नधान्याचा पुरवठा मागणीपेक्षा कमी पडतो.
३. लोकसंख्या वाढीमुळे सामाजिक व आर्थिक विकास प्रक्रियेत अडथळा निर्माण होते.
४. देशातील गुंतवणुकीवर व पर्यायाने आर्थिक विकासाच्या वेगावर प्रतिकुल परिणाम होते.
५. लोकसंख्या वाढल्यामुळे रोजगार उपलब्ध होत नाही.त्यामुळे बेकारीत वाढ होऊन देशाच्या विकासात अडथळे निर्माण होतात.
६. देशाची बचत गुंतवणुकीची क्षमता कमी होते, राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न इतके कमी होते की, व्यक्तिकडून बचत होऊ शकत नाही त्यामुळे आर्थिक विकास होत नाही.

७. जनतेच्या राहणीमानाचा दर्जा किमान पातळीवर टिकविणे कठीण जाते. त्यामुळे दारिद्रयरेषेखालील जीवन जगणा—या लोकसंख्येत भर पडते.

८. भांडवल निर्मितीत घट होऊन विकास प्रक्रियेवर मर्यादा पडतात.

९. थ्वविध समाजिक समस्या/सामाजिक संघर्ष निर्माण होतात. आणि ते देशाच्या विकासात अडथळा निर्माण करतात.

१०.पर्यावरणाचा समातोल बिघडतो आणि त्याचा देशाच्या विकासावर विपरित परिणाम होतो.

आज भारताची लोकसंख्या अतिरिक्त असून ती देशाच्या विकासकामात, अन्नधान्य प्रश्न,बेकारी व अर्ध बेकारी समस्या, दरडोई उत्पन्नाची पातळी कमी होते. राहणीमानाचा दर्जा कमी होत चालला आहे. बचत व गुंतवणुकीवर विपरित परिणाम झाल्याने भांडवनिर्मितीचा वेग मंदावतो याचा एकत्रित परिणाम म्हणून देशाच्या विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात.

**निष्कर्ष:**

लोकसंख्या हा आर्थिक विकासाचा प्रमुख सक्रिय घटक व आधार आहे. परंतु लोकसंख्येत होणारी वाढ ही त्या देशातील उपलब्ध असणा—या नैसर्गिक साधन सामग्रीचा पुरेपुर किंवा पर्याप्त वापर होईल इतकी असावी. अन्यथा अतिरिक्त लोकसंख्यावाढ अक्राळविक्राळ स्वरुप धारण करेल अनेक समस्यांना लोकसंख्यावाढ नियंत्रित ठेवणे हा एक ज्वलंत मुलभूत प्रश्नच निर्माण झाल्याचे आडळून येते.म्हणून यावर वेळीच उपाय किंवा लोकसंख्या वाढीला आळा घातला पाहिजे.

## संदर्भ ग्रंथ :

१. दै.तरुण भारत सांगली १ एप्रिल २०११

२. प्रा.डॉ. टी.एम.भोसले, मानव संसाधन विकास संपादक डॉ. जे.एफ. पाटील वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र,फडके प्रकाशन कोल्हापूर प्र.आ.२००४

३. प्रा.के.एच.ठक्कर लोकसंख्याशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर प्र.आ.२००५

४. Agrwal A.N.Indian Economy wishwa prakashan new delhi 2000

५. संपदा जाने. २०१२